RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

# मयमतंमधून दिसणारा भारतीय समाज एक अभ्यास

**नरेंद्र मन्द्रुपकर,**
इस्लामपूर
**डॉ. एस. के. जाधव,**
छ. शिवाजी कॉलेज, सातारा.

**सारांश**

*मयमतम् हा मध्ययुगीन काळातील भारतामध्ये निर्माण झालेला स्थापत्यशास्त्रविषयक संस्कृत ग्रंथ आहे. भारतामध्ये स्थापत्यशास्त्र या विषयाचा मोठा गौरव करण्यात आलेला आहे. स्थापत्यशास्त्राला उपवेदाचा दर्जा देण्यात आलेला आहे. स्थापत्यवेद हा अथर्ववेदाचा उपवेद मानला जातो. या शास्त्रावर त्याच्या या माहात्म्यामुळे व व्यावहारिक उपयोगामुळे अनेक ग्रंथ रचले जाणे साहजिकच होते. अशा ग्रंथांची एक मालिका भारतीय इतिहासाचा अभ्यास करताना आपल्याला दिसून येते. या ग्रंथ मालिकेमध्ये स्थान असलेला 'मयमतम्' हा एक महत्वाचा संस्कृत ग्रंथ आहे.*

**प्रस्तावना**

भारतीय संस्कृतीमध्ये स्थापत्यशास्त्राची मोठी गौरवशाली परंपरा दिसते. मेहरागढ येथील उत्खननातून इ. पूर्व 7000 इतक्या प्राचीन काळाची बांधकामे दिसून येतात. राकीगढी, मोहेंजोदडो, हडाप्पा, कालीबंगन, लोथल इत्यादी अनेक ठिकाणच्या उत्खननांमधून आपणाला वैविध्यपूर्ण बांधकामे दिसून येतात. कालीबंगन येथील किल्ला आणि घराची बांधकामे, मोहेंजोदडो येथील घरे, सार्वजनिक स्नानगृह, भुयारी गटारे, रूंद रस्ते, बांधव विहिरी यांची बांधकामे, राकीगढी येथील अशी विविध बांधकामे आणि लोथल येथील बंदराचे बांधकाम यांचा विचार केल्यास भारतातील स्थापत्यशास्त्राची ही परंपरा केवळ काळदृष्टया प्राचीन आहे एवढेच नव्हे, तर ही परंपरा मोठी गौरवशाली आहे असे म्हणण्यास हरकत नाही.

या परंपरेबरोबरच प्राचीन साहित्य ग्रंथातून येणारे विविध स्थापत्य रचनांचे उल्लेख आपल्याला या गौरवशाली परंपरेच्या अखंडत्वाची जाणीव करून देतात. यादृष्टीने विविध पुराणे, रामायण—महाभारतासारखी प्राचीन महाकाव्ये, दंडी, कालिदास, भास, भवभूति, शुद्रक, विशाखादत्त यांच्या ललित रचना या सर्वामध्ये स्थापत्याच्या विविध आकार, प्रकारांचे विपुल वर्णन उपलब्ध आहे.

मध्ययुगीन काळामध्ये राजस्थानातील किल्ल्यांची बांधकामे, ओडीसातले कोणार्क येथील सूर्यमंदिरासारख्या अव्दितीय कलाकृती, महाराष्ट्रातील अजंठा, वेरूळ, कार्ले, भाजे, जुन्नर येथील लेणी, दक्षिण भारतातील पट्टदकल, ऐहोळे, बादामी येथील मंदिर रचना तसेच दक्षिण भारतातील चोलकालीन आणि तत्पूर्वकालीने मंदिरे ही भारतातील स्थापत्यशास्त्राच्या गौरवशाली परंपरेच्या मध्ययुगीन कालापर्यंतच्या अक्षुण्णतेची यथार्थ जाणीव करून देतात.

भारतातील स्थापत्यशास्त्राची ही प्राचीन आणि गौरवशाली परंपरा अनेक अभ्यासकांच्या अभ्यासाचा विषय झाली आहे यात काही नवल नाही. या स्थापत्य तसेच शिल्पांच्या उपलब्ध कृतींवरून, अवशेषांवरून अनेक क्षेत्रात उपयोगी पडणारी महत्वाची माहिती हाती लागते. सुमारे 15 लाख चौ. कि. मी परिसरामध्ये सापडलेल्या सिंधू—सरस्वती संस्कृतीतील अवशेषांवरून कित्येक महत्वाचे निष्कर्ष हाती लागले. गंगा यमुनेच्या दुआबापासून ते बलुचिस्तानमधल्या मेहरागढपर्यंत प्राप्त झालेल्या अगदी एकसारख्या आकाराच्या विटा, एकसारख्या पध्दतने घडविलेली आणि एकसारख्या पध्दतीच्या नक्षीने सजवलेली काळी,तांबडी व राखाडी रंगाची मातीची भांडी यावरून या सर्व प्रदेशात एक संस्कृती नांदत होती व व्यापार, दळणवळण, मोजमाप पध्दती, स्थापत्य रचना या सर्व कारणांनी ती एकजीव झाली होती. कदाचित तिची स्वतःची अस्मिता निर्माण झाली होती. एवढया निष्कर्षापर्यत आता अनेक अभ्यासक पोहोचले आहेत.

सिंधू—सरस्वती संस्कृतीतील उत्खनन व पुरातत्वामधून निर्माण झालेल्या नगररचना व वास्तुरचना, भांडी, मुद्रा, मानव व इतर प्राण्यांचे सांगाडे, खेळणी, शिल्पकृती या सर्वावरून तत्कालीन संस्कृतीबद्दल कसे सुसंगत निष्कर्ष काढता येतात याचा एक आदर्श वस्तुपाठच निर्माण झालेला दिसतो. संस्कृतचा अभ्यासक या नात्याने प्रस्तुत संशोधकाला मयमतम् हा ग्रंथ अभ्यासनीय वाटला तो याच दृष्टीने. मयमतम् या ग्रंथाची सटीक आवृत्ती तयार करणाऱ्या ब्रूनो डेजन्स या विद्वानांन प्रतिपादित केल्याप्रमाणे

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

मयमतम् हा इ. सनाच्या 11 व्या शतकातील ग्रंथ ठरतो. सुमारे 1000 वर्षापूर्वीच्या हया ग्रंथाच्या अभ्यासामधून तत्कालीन भारतीय संस्कृतीविषयी काही महत्वाची माहिती मिळणे शक्य आहे काय? अशा स्वरूपाच्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचे उद्दिष्ट डोळयांसमोर ठेवून प्रस्तूत संशोधनाचा प्रकल्प हाती घेतलेला आहे.

**उद्दिष्टये**

1) मयमतम ग्रंथाच्या आधारे तत्कालीन समाजातील तांत्रिक व शास्त्रीय प्रगतीचा अभ्यास करणे.

2) प्रस्तुत ग्रंथाधारे तत्कालीन समाजाच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

3) प्रस्तुत ग्रंथाधारे तत्कालीन समाजाच्या श्रध्देय दैवतांचा व देवतार्चन विधींचा अभ्यास करणे.

4) मयमतम् ग्रंथामधून दिसणाऱ्या समकालीन राज्य व प्रशासन व्यवस्थेचा अभ्यास करणे.

5) ग्रंथामधून प्रत्ययास येणाऱ्या सर्वसामान्य मानवी जीवनाचे विविध पैलू अभ्यासणे.

**पूर्व संशोधनाचा आढावा**

मयमतम् या ग्रंथाची सटीक व भाषांतरसहीत आवृत्ती काढण्याचे कार्य झालेले आहे. अशी आवृत्ती श्री. ब्रूनो डेजन्स, फ्रान्स यांनी फ्रेन्च इन्स्टिटयुट, पॉण्डेचेरी येथे प्रसिध्द केली. त्याचे इंग्रजी भाषांतर इंदिरा गांधी नॅशनल सेंटर फॉर द आर्ट यांनी केले. हिन्दी भाषेत असेच कार्य झालेले आहे. डॉ. श्रीकृष्ण चौहान यांनी चौखंबा संस्कृत सिरीज या ग्रंथमालेत, हिंदी टीकसह मयमतम् हे पुस्तक प्रसिध्द केले आहे. अशा प्रकारे या ग्रंथाच्या सार्थ व सटीक आवृत्या निर्माण झाल्या असल्यातरी समालोचनात्मक दृष्टीने या ग्रंथातील विविध विषयांचा अभ्यासयुक्त परामर्श घेतला गेलेला नाही. म्हणून मयमतम या ग्रंथाचे असे संशोधन करणे आवश्यक आहे.

**संशोधन पध्दती**

संशोधनाची उद्दिष्टये डोळयासमोर ठेवून त्यातील विषयांची व्याप्ती व मर्यादा सांभाळून मयमतम या ग्रंथातील श्लोकांच्या आधारे ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा वापर करून प्रस्तुतचा अभ्यास करण्यात येणार आहे.

**मयमतम ग्रंथातून प्रत्ययास येणारी शास्त्रीय व तंत्रशास्त्रीय प्रगती**

प्रस्तुत ग्रंथ हा मूलतः स्थापत्यसारख्या तंत्रशास्त्रीय विषयाचा ग्रंथ असल्यामुळे या ग्रंथामध्ये तंत्रशास्त्रीय विषयांचा उल्लेख, वर्णन, चर्चा ही मोठया प्रमाणावर समाविष्ट झालेली आहे. अशा प्रकारे या ग्रंथात अनेक शास्त्रीया विषय मूळ स्थापत्यशास्त्र विषयाच्या अनुषंगाने प्रविष्ट झालेले आहेत.

**मोजमाप साधने**

कोणत्याही समाजाच्या शास्त्रीय अंगाची प्रगती ही त्या समाजात उपयोगात आणली जाणारी मापनाची साधने कशी आहेत, यावर अवलंबून असते. इतके या विषयाचे महत्व आहे. ज्या समाजामध्ये अणू ही संकल्पना विद्यमान असते. त्या समाजामध्ये अणूचे विविधांगी परिमाण समजून घेण्याची साधने अस्तित्वात असावीच लागतात. या अर्थाने पहिल्यास अतिसुक्ष्मापासून ते अतिबृहत परिमाणापर्यत मोजामापाची साधने हाती असलेला समाज शास्त्रीयज्ञानदृष्टया प्रगत असतोच. त्यामुळे या विषयाचा समावेश सदर अभ्यासात करणे आवश्यक वाटले. मूळ ग्रंथातही या विषयाची सांगोपांग चर्चा आलेली आहेच.

**स्थापत्याची साधने**

ग्रंथामधून उल्लेखण्यात आलेली स्थापत्यविषयक विविध साधने हा अभ्यासाचा विषय आहे. या साधनांमधून तत्कालीन तज्ञ कारागिरांचे या विषयावरील प्रभुत्व समजते. तसेच त्यांची कामकाज पध्दतीही लक्षात येते. यादृष्टीने ही बाब अभ्यासनीय ठरते.

**बांधकामाचे साहित्य**

बांधकामामध्ये काही साहित्य हे निसर्गतः प्राप्त होणारे असते. त्यावर काही संस्कार करूनते बांधकामात उपयोगात आणावे लागते. दगड, लाकूड हे अशा प्रकारचे साहित्य घटक होत. काही साहित्य मानवनिर्मित असते. विटा, कौले, काच हे अशा प्रकारचे साहित्य घटक होत. या सर्व साहित्य घटकांची निर्मिती, संस्कार आणि उपयोजन यामध्ये समकालीन शास्त्रीय प्रगतीवर चांगला प्रकाश पडतो.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

**गणित**

स्थापत्यशास्त्रमध्ये विविध आकार निर्मिण्याची गरज असते. उंच सखल भूमीवर वेडयावाकडया पाषाणांची मदत घेऊन जी स्थापत्य रचना केली जाते ती समतल चौथऱ्यावरील सुडौल निर्मिती असे. हे साधण्यासाठी भूमितीविषयक व गणितविषय ज्ञानाची प्रगत अवस्था समाजने प्राप्त केलेली असावी लागते. प्रस्तूत ग्रंथामध्ये विशाल राजवाडे, अनेक मजली देवालये आणि विशिष्ट आकाराची गोपूरे यांच्या बांधकामाचे विवेचन आले आहे.

**स्थापत्यशास्त्रातील तज्ज्ञ**

ग्रंथामध्ये वर्णन केल्याप्रमाणे स्थापत्यशास्त्रामध्ये कुशल असलेले स्थपति, शिल्पी, तक्षक यांचे वर्ग समाजात विद्यमान होते असे दिसते. या प्रत्येकाचे तंत्रशास्त्रीय ज्ञान किती असवो यासंबंधी ग्रंथकाराने काही मानक ठरवून दिले आहेत. तसेच त्यांच्या जबाबदाऱ्यांही निश्चित केल्या आहेत. त्यावरूनही तत्कालीन समाजातील तंत्रज्ञानाचा प्रसार समजतो.

**ग्रंथातून दिसून येणारी समाजव्यवस्था**

ग्रंथ जरी स्थापत्यशास्त्रविषयक ग्रंथ असला तरी आदर्श ग्रामरचना, नगररचना व वास्तुविषयक विविध प्रमाणे, रचना वैशिष्टय यातील अनेकविध उल्लेखांवरून ग्रंथनिर्मितीच्याकाळातील समाज रचनेची अनेक वैशिष्टये ध्यानात येतात.

**आर्थिक अवस्था**

नगररचना, ग्रामरचना या संदर्भात ज्या करागिरांच्या नावांचा उल्लेख येतो, तसेच नगर विभागांमध्ये विविध पध्दतीने उपजिवीका करणाऱ्यांकरिता ज्या सुविधा उपलब्ध करण्याचे निर्देश दिसतात. त्या उल्लेखांवरून व निर्देशावरून सदर समाजाची अर्थनिर्मितीची साधने कोणती होती याचा अभ्यास करण्यात येईल. तसेच विविध समाज घटकांकरता कोणत्या प्रकारच्या व कोणत्या दर्जाच्या वास्तू निर्देशित करण्यात आल्या आहेत यावरून त्या त्या समाज घटकांच्या अर्थिक स्थितीचे काही प्रत्यंतर येते.

समाज संघटन

प्रस्तुत ग्रंथामध्ये ग्रामरचना व नगररचना याविषयी आलेल्या विवेचनातून तसेच अशा नगरांमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या सार्वजनिक उपयोगाच्या इमारतीधून तत्कालीन समाजाच्या विविध घटकांचे तसेच त्यांच्या परस्पर संबंधाचे ज्ञान करून घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

**नगर व जानपदरचना**

या रचनांमधील सार्वजनिक उपयोगाच्या इमारती, रस्ते, पाणीपुरवठा, सुरक्षा व्यवस्था, (तट, वेशी इत्यादी) यांच्या वर्णनावरून तत्कालीन समाजाची आर्थिक स्थिती प्रत्ययास येते. तसेच तत्कालीन राजेशाही लोकाभिुख होती किंवा कसे याचे प्रत्यंतर येते. राज्यव्यवस्थेमध्ये कल्याणकारी समाज निर्मितीची काही बीजे दिसतात.

**राज्य आणि प्रशासन**

व्यवस्था प्रस्तूत ग्रंथामध्ये वास्तूरचना व नगररचनांच्या अनुषंगाने राजवाडयांचे वर्णन येते. त्यामध्ये राजा, राजमंडळ विविध खात्यांचे प्रधान, राजवाडयांतील इतर कार्यकारी सेवक वर्ग, कोष व्यवस्था, रथ, हत्ती, घोडे इत्यादी यान व्यवस्था तसेच राजवाडयातील दालनाच्या उपयोजनांविषयीचे उल्लेख यातून राज्यव्यवस्थेचा प्रमुख जो राजा त्यांच्यासंबधी आणि त्याच्या कार्यकारी प्रशासन व्यवस्थेसंबंधी माहिती मिळते. नगर रचनेतून प्रशासन व्यवस्था व संरक्षण व्यवस्था समजते. प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या वर्णनावरून व कोष व्यवस्थेच्या वर्णनावरून राज्याच्या अर्थव्यवस्थेसंबंधी काही मत निर्माण होऊ शकते.

**प्रशासन व्यवस्था**

या ग्रंथात वास्तुरचनेच्या विषयामध्ये प्रासाद रचना या विषयाचा विशेषत्वाने समावेष झालेला आहे. प्रासाद रचनेच्या अनुषंगाने, राजवाडयांतील कार्यालयांची वर्णन, सेवक वर्गाचे उल्लेख, त्यांच्यासाठी केलेल्या विविध व्यवस्था, या व्यवस्थांचा दर्जा यांचे उल्लेख, या सर्वांवरून प्रशासन व्यवस्थेवर प्रकाष पडतो. नगररचनेमध्येही असे काही महत्वाचे प्रशासनविषय उल्लेख येतात. या सर्वांचा तत्कालीन प्रशासन व्यवस्था समजून घेण्यास उपयोग होतो.

**संरक्षण व्यवस्था**

या ग्रंथामध्ये रथशाला, गजशाला, अश्वशाला, सेनानिवेश यांच्याबद्दल पुष्कळ चर्चा आहे. नगरांच्या संरक्षण व्यवस्था, किल्ले व त्यांचे प्रकार यासंबंधींचे उल्लेख या सर्वावरून संरक्षण व्यवस्थेची काही माहिती मिळते.

या ग्रंथांमध्ये प्रजाजनांच्या अनेक वर्गांचे उल्लेख येतात. नगररचनेच्या अनुषंगाने विविध कर व्यवस्था, पणन व्यवस्था यांचेही उल्लेख येतात. राजवाडयांतील कोषव्यवस्था, विविध प्रशासनिक अधिकाऱ्यांचे उल्लेख यांवरूनही अर्थव्यवस्था चांगली समजून घेता येते.

**लोकांची राहणी अन्न व वस्त्र**

यामध्ये लोकांची राहणी, त्यांचे अन्न व वस्त्र इत्यादी विषयांची चर्चा केली जाणार आहे. व्यक्तीच्या श्रेष्ठ कनिष्ठतेनुसार त्यांच्या घरांची रचना केलेली आढळते. त्याचप्रमाणे अन्नालय, धान्याल, धनालय अशा स्वतंत्र भावनांची निर्मिती केलेली दिसते. या अनुषंगाने या ग्रंथात जी चर्चा, उल्लेख येतात त्यातून तत्कालीन समाजजीवनाच्या या अंगावर प्रकाश पडला आहे. कृषी व पशुपालन यांसारखे मूलभूत व्यवसाय, तसेच विकसित अर्थव्यवस्थेचे द्योतक असे इतर यासंबंधीचे उल्लेख, दळणवळण साधनांतून आढळणारे व्यापार, या विषयीचे उल्लेख तसेच नरगररचनेमध्ये वर्णन केलेली विपणिस्थाने (बाजारहाट) याविषयीची अभ्यास केला आहे.

**समारोप**

1) ग्रंथातून दिसणारे विविधांगी समाज जीवन

वर उल्लेख केल्याप्रमाणे, या ग्रंथातील विविध विषयांवरील चर्चेमधून तसेच अनेक उल्लेखांवरून निर्देशांवरून अभ्यासकाला समकालीन समाजचे धार्मिक जीवन, आर्थिक जीवन, सामाजिक जीवन यांचा उलगडा, त्यातून भारतीय संस्कृतीच्या तत्कालीन स्थितीचा आढावाही घेता आला.

2) ग्रंथातून दिसणारी तंत्रज्ञ प्रगतीची अवस्था

वास्तुशास्त्र अथवा स्थापत्यशास्त्र हा विज्ञान–तंत्रज्ञान संबंधित विषय असल्याने या ग्रंथात गणित–भूमिती, स्थापत्यशास्त्र, खगोलशास्त्र, मापनशास्त्र अशा अनेकविध विषयांचा आढळ होतो. या सर्वांवरून तत्कालीन समाजाच्या तंत्रशास्त्रीय प्रगतीविषयी मत मांडणे शक्य झाले.

**संदर्भ ग्रंथ सूची**

मूल ग्रंथ
1) Bruno Dagens MAYAMATAM, Indir Gandhi National Centre for Arts, New Delhi
2) डॉ. श्रीकृष्ण जुगनू, मयमतम, चौखंबा संस्कृत सीरीजच, वाराणसी

**संदर्भ ग्रंथ सूची**

1) घनश्याम त्रिपाठी – अग्निपुराण – हिंदी साहित्य संमेलन, प्रयाग 1998
2) प्र. न. जोशी – मत्स्यपुराण – प्रसाद प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती शके 1904
3) वे. शा. सं. रा. विष्णूशास्त्री बापट – भविष्यपुराण – वाई – पुराणप्रकाशक मंडळी, शके 1883
4) वास्तुमत्रजरी – सुत्रधार नाथा कृत संपादक – श्रीकृष्ण जुगनू –चौखम्बा संस्कृत सीरीज, वाराणसी, प्रथमावृत्ती, 2006
5) वास्तुरत्नावली – जीवनाथ झा दैवज्ञ कृत – चौखम्बा अमरभारती प्रकाशन, वाराणसी, तृतीयावृत्ती, 1981.
6) प्र. न. जोशी – भविष्यपुराण – प्रसाद प्रकाशन पुणे, व्दितीयावृत्ती, शके 1904
7) डॉ. र. पु. कुलकर्णी – भारतीय वास्तुशास्त्र – श्री मध्यभारत हिन्दी साहित्य समिती, प्रथमावृत्ती 1995.
8) कुमार पुष्पेंद्र – समराग्डण सूत्रधार – न्यू भारतीय बुक कॉर्पोरेशन, दिल्ली व्दितीयावृत्ती 1998.